# प्रकरण चौथे

## सातारा प्रतिसरकारची घटना

# प्रकरण चौथे

## सातारा प्रतिसरकारची घटना

क्रांतिसिंह नाना पाटील आणि त्यांचे सहकारी जी.डी. लाड यांना सतत त्यांच्या कार्यात यश मिळत गेले. असे असले तरी इंग्रज पोलिसांचा अत्याचार गावगुंडांचा अन्याय, सावकाराच्या व्याजाने भरडली जात असलेली सर्वसामान्य जनता, व्यभिचारी व व्यसनी लोकांचे स्त्रियांवर होणारे अत्याचार, दरोडेखोरांचा होणारा त्रास तसेच इंग्रज धार्जिण्या खब-यांचा त्रास इत्यादी कारणामुळे सर्वसामान्य जनता कंटाळली होती. त्यांच्यावरील होणा-या अन्यायाबाबत इंग्रज अधिकारी अजिबात दखल घेत नसत. कब्जे दलाली व भाऊबंदकी यामुळे जनता पूर्णपणे भरडली जात असे.

अशा अस्थिर व अडचणीच्या प्रसंगी नाना पाटील व त्यांचे सहकारी जी.डी. लाड रात्री जनजागृतीच्या सभा घेत असत. त्यांच्या विचाराचा जनतेवर चांगलाच परिणाम झाला. त्यामुळे अन्याय व अत्याचार होणारे लोक आपण होऊन आपल्या तक्रारी भूमिगत कार्यकर्त्यांकडे घेऊन येऊ लागले. साहजिकच अशा अन्यायाचे परिमार्जन करण्याची जबाबदारी आपोआप भूमिगत कार्यकर्त्यांवर येऊन पडली. त्यामुळे जनतेच्या गरजेतूनच सातारा प्रतिसरकार निर्माण झाले. [१] अशा या सातारा प्रतिसरकारची रितसर स्थापना १ जून, १९४३ रोजी करण्यात आली. [२]

सातारा जिल्ह्यातील औंध संस्थानचे अधिपती श्रीमंत भवानराव पंतप्रतिनिधी यांनी आपल्या संस्थानी प्रजेस चलेजाव आंदोलनाचे आधीच ग्रामराज्याचे अधिकारी दिले होते. त्यांचे धोरण पुरोगामी होते. तसेच

त्यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण केले होते. श्रीमंत भवानराव पंतप्रतिनिधी व त्यांचे सुपुत्र बॅरिस्टर आप्पासाहेब पंत यांचा या चळवळीस पाठींबा असे. त्यामुळे औंध संस्थानच्या धर्तीवरच प्रतिसरकारची घटना तयार करण्यात आली. त्यानंतर भूमिगतांच्याकडे आलेल्या हजारो अर्जांचे न्यायदानाचे कामकाज सुरु करण्यात आले. जनतेची पिळवणूक करणा-यांवर जनतेची पिळवणूक करणा-यांवर सातारा प्रतिसरकार शिक्षा करु लागले. त्यामुळे सातारा प्रतिसरकारच्या राज्यात दरोडे व चो-यांचे प्रमाण शेकडा ८० टक्के कमी झाले. तसेच व्यभिचाराची प्रकरणे ९० टक्के बंद करण्यात आली. किरकोळ कारणावरुन नव-याने सोडून दिलेल्या स्त्रिया १०७ टक्के नव-यांनी परत नांदविल्या. त्यांचे संसार परत सुरु करण्यात आले. सातारा प्रतिसरकारने सुमारे पन्नास हजार अर्जांचा निकाल कमी वेळेत दिला व लाखो रुपयांच्या कोर्ट खर्चापासून सर्वसामान्य जनतेस वाचविले. सातारा प्रतिसरकारने या विधायक कार्याबरोबरच राष्ट्रीय बचत केल्याचे दिसून येते.[३]

सातारा प्रतिसरकारच्या अम्मलबजावणीसाठी राखीव फौज म्हणून लष्करी धर्तीवर शिक्षण दिलेले "तुफान सैनिकांचे दल" निर्माण करण्यात आले. त्याचे प्रशिक्षण कुंडलच्या व्यायामशाळेत दिले जात असे. व्यायामशाळेचे संयोजन आप्पासाहेब लाड गुरुजी यांचेकडे असे. क्रांतिअग्रणी जी. डी. लाड हे या तुफान सेनादलाचे फिल्डमार्शल होते.

अशा या प्रसिध्द सातारा प्रतिसरकारची घटना भूमिगत क्रांतिवीरांनी केली. प्राप्त परिस्थितीचा सखोल अभ्यास करुन सर्वमान्य न्याय देण्याच्या हेतूने घटना तयार करण्यात आली. घटना लोकशाही पध्दतीने

तयार करण्यात आली. शेकडो तरूण बातांशी धरून प्रत्येक गावी न्यायदान समित्या स्थापन करण्यात आल्या. त्या विविध समित्या पुढीलप्रमाणे होत्या.[४]

तडजोड कमिटी

सातारा प्रतिसरकारच्या घटनेमधील तडजोड कमिटीला महत्वाचे स्थान असे. या तडजोड कमिटीमार्फत न्यायदानाचे कामकाज चालत असे. या कमिटीत त्या त्या गावातील वयस्कर व जबाबदारी रहिवाशांची कमिटी केली जात असे. या कमिटीतील सदस्यांची निवड प्रौढ लोकांच्या मताधिक्क्याने केली जाई. ज्या गावची लोकसंख्या एक हजार असे त्यासाठी पाच सदस्यांची कमिटी केली जात असे. एक हजारपेक्षा गावची लोकसंख्या जास्त असेल तर तडजोड कमिटीतील सदस्यांची संख्या सात असे. ठराविक लोकांची न्यायदानात मक्तेदारी नको म्हणून सदरची कमिटी एक वर्षासाठी नेमली जाई.

निरव्यसनी व प्रामाणिक असणा-या सदस्यांची या कमिटीत निवड केली जात असे. या कमिटीत निवड केलेला एखादा सदस्य नंतर व्यसनी असल्याचे लक्षात येताच त्यास सुपरवायझरच्या शिफारशीने काढले जात असे.

या कमिटीमार्फत विविध प्रकारची कार्ये केली जात. त्यामध्ये गावचे संरक्षण, शिक्षणप्रसार, लोकांचे आरोग्य राखणे, ग्रामोद्योग, रस्ते दुरूस्त करणे, गावाला पाणीपुरवठा करणे इत्यादी कामे केली जात असत.

सार्वजनिक कार्याबरोबर न्यायदानाचे कामकाज या कमिटीमार्फत केले जाई. चालू कायदा व शांतता यांना बाधा न येता नित्य व्यवहारातील

कटकटी मिटवून गावात शांतता प्रस्थापित केली जाई. कब्जेगहाण व तारण गहाण दस्त सावकाराकडून फेडण्याकरिता ज्यावेळी या कमिटीकडे अर्ज येत असे त्यावेळी थकलेल्या वर्षांच्या व्याजाचा हिशोब शेकडा सहा टक्के-प्रमाणे करण्यात येत असे. मात्र सर्व मिळून व्याजाची रक्कम दामदुप्पटीपेक्षा जास्त होणार नाही याची काळजी घेतली जात असे. अपिलाचा निर्णय लागेपर्यंत पूर्वीप्रमाणेच वहिवाट ठेवली जात असे. अपिल करणाऱ्या अर्ज-दाराचे नाव, गाव अपिल कमिटीकडे किंमतीच्या शेकडा अडीच रुपये फी म्हणून घेतली जात असे.

या कमिटीचे खास वैशिष्टय म्हणजे कमिटीतील एखाद्या सदस्याच्या विरुद्ध तक्रार अर्ज आल्यास त्यास न्यायदान कमिटीचा सदस्य म्हणून न्याय-दान कमिटीत बसता येत नसे. त्या आलेल्या अर्जाचा निकाल राहिलेल्या पंचाच्या बहुमताने निर्णय घेतला जात असे. दिलेल्या निर्णयाविरुद्ध एखाद्या-ला अपील करावयाचे असल्यास त्याचा अर्ज पंचायत कमिटीमार्फत आल्यानंतर स्वीकारला जात असे. [५]

गट कमिटी :

सातारा प्रतिसरकारमध्ये प्रत्येक गावचा सेक्रेटरी व सुपरवायझर यांची एक गट कमिटी केली जात असे. ज्या गावचे अपिल असेल त्या गावी गट कमिटी-तील सर्व सदस्य जातीने हजर रहात असत. सर्व उलट-सुलट तपासणी करुन कमिटीचा अध्यक्ष सुपरवायझरचा अभिप्राय विचारात घेऊन निकाल देत असे.

ज्या त्या गावातील न्यायालयीन कामकाजासाठी गावच्या उत्पन्नाच्या अर्धा हिस्सा गाव कमिटीकडे पाठविला जात असे. या सर्व कमिटीवर मध्यवर्ती कमिटीचा अधिकार चालत असे. मध्यवर्ती कमिटी आपल्या धोरणाप्रमाणे वेळोवेळी आपले नियम प्रसिध्द करीत असे. यामध्ये महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे

प्रत्येक कमिटी आपले अंदाजपत्रक तयार करून त्यावर आपल्या वरिष्ठांची मंजूरी घेई. वरिष्ठ कमिटी ही दोन निरीक्षक व एक कायदेतज्ज्ञ यांची केली जाई. ज्या गावची केस असेल त्या गावचे पंच असेसर्स (मूल्यमापन कमिटी) मदतीला घेतले जाई.

गट कमिटीचे अधिकार :

सातारा प्रतिसरकारमध्ये या कमिटीला महत्त्वाचे स्थान असे. या कमिटीची कामे व अधिकार पुढीलप्रमाणे - त्यामध्ये सामाजिक शांततेला बाधा न आणता दररोजच्या व्यवहारातील तंटे मिटवून गावात शांतता प्रस्थापित करण्याचे काम या कमिटीकडे असे. तसेच खरेदीपत्रे, मृत्यूपत्रे, बक्षिसपत्रे, वारसाहक्क, याबरोबरच इतर कामांचा निर्णय या कमिटी-मार्फत घेतला जात असे. एखाद्या दाव्यामध्ये शंभर रुपये किंमतीच्या आतील दाव्यात एकमताने निर्णय दिल्यानंतर त्या पक्षकारास अपील करण्याची परवानगी दिली जात नसे.

सन १९२६ पूर्वीचे कोणत्याच प्रकारचे दावे या कमिटीने स्वीकारू नयेत अशा प्रकारचा नियम करण्यात आला होता. एखाद्याला परत अपील करावयाचे असल्यास पंधरा दिवसाच्या आत अपील करावे लागत असे. ज्या व्यक्तीला अपील करावयाचे असेल त्याने कमिटीचे सेक्रेटरी यांच्याकडे अपील करावे असा नियम असे. गावकमिटीच्या अम्मलबजावणीचा अधिकार सुपर-वायझरचा असे. ज्या व्यक्तीला गुन्हेगारी स्वरूपाचा तक्रार अर्ज करा-वयाचा असेल त्या व्यक्तीस आठ आणेपेक्षा कमी फी घेतली जात नसे. ज्या दाव्यात वादीसारखा निकाल लागत असे त्यावेळी एकूण किंमतीवर

पाच रुपये कमिशन घेतले जाई. या कमिटीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही कमिटी आपल्या कामाचा रिपोर्ट आपल्या वरिष्ठांकडे दर महिन्याच्या एक तारखेस पाठवित असे. त्यानंतर पर्यवेक्षक (सुपरवायझार्स) आपआपल्या कामाचे रिपोर्ट तपासणीस (इन्स्पेक्टरांचेकडे प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेच्या आत पाठविले जात असे. तक्रार अर्ज केल्याच्या वेळी निकालात काढण्यासाठी गाव कमिटीची बैठक आठवडयातून एक वेळा घेतली जात असे.

## गट कमिटीची कामे :

लोकांना वेळेत न्याय मिळावा म्हणून गट कमिटीची बैठक महिन्यातून दोन वेळा घेतली जात असे. दोन तृतीयांश पेक्षा कमी सदस्य असतील तर कमिटीचे कामकाज तहकूब केले जाई. पर्यवेक्षक हा गटकमिटीचा अध्यक्ष या नात्याने काम पहात असे. एखाद्या गुन्हेगारी केसचा निकाल दिल्यानंतर त्याला परत अपील करता येत नसे. तसेच गट कमिटीने इतर केसच्या बाबतीत दिलेल्या निकाल अपिलावर पंधरा दिवसाच्या आत अपील करता येत असे. परंतु अपील पर्यवेक्षक (सुपरवायझारकडे) दाखल करावे लागे. अशा प्रकारची गट कमिटीची विविध प्रकारची कामे होती. [६]

## मध्यवर्ती कमिटी :

सातारा प्रतिसरकारमध्ये या कमिटीला अनन्यसाधारण महत्त्व होते. गट कमिटीने दिलेल्या निर्णयावर या कमिटीचा निर्णय अखेरचा समजला जात असे. एखाद्या मुद्याचे विवेचन करण्याचे राहिले आहे असे लक्षात आल्यास

त्याच कोर्टापुढे पक्षकारास तपासणी अर्ज करता येत असे. या कमिटीपुढे येणाऱ्या अपील अर्जावर एकूण किंमतीच्या शेकडा दोन रुपये फी आकारली जात असे. या कमिटीपुढे पक्षकारांना आपल्या पतीने आपली बाजू मुखत्यारामार्फत मांडण्याची परवानगी असे. अशा प्रकारचा मध्यवर्ती कमिटीचा कारभार चालत असे. ७

न्यायालयीन कामकाज सुरळीत चालवण्यासाठी त्याचे विविध विभाग पाडले होते. ते पुढीलप्रमाणे - त्यामध्ये जी.डी. लाड यांचेकडे पूर्वभाग बंदोबस्तासाठी सोपविण्यात आला होता. त्यानंतर पश्चिम भाग धन्वंतरी ल.गो. कासेगावकर यांचेकडे असे तर दक्षिण भाग पांडू मास्तर आणि संपूर्ण उत्तरभाग किसनवीर व बोराटे यांचेकडे होता. त्याप्रमाणे निरनिराळ्या ठिकाणी थोडयाफार फरकाने एकाच स्वरूपाची घटना असे. परिस्थितीनुसार काही ठिकाणी बदल केला जात असे. ग्रामराज्याचा प्रचार करण्याचे काम कुंडलचे प्रसिध्द शाहीर शंकरराव निकम यांच्याकडे देण्यात आले होते. ते काम त्यांनी आपल्या पोवाडयातून ग्रामराज्याचे महत्व लोकांच्या मनात बिंबवले.

## प्रतिसरकारचे न्यायालयीन कार्य :

प्रतिसरकारने जे ग्रामराज्य स्थापन केले होते त्या ग्रामराज्याने न्यायदानाच्या व्यवस्थेसाठी स्वतंत्र न्यायदान मंडळे स्थापन केली होती. निरनिराळ्या विभागासाठी स्वतंत्र न्यायमंडळे होती. कुंडल गटाचे जे न्यायदान मंडळ होते त्याच्या व्यवस्थेसाठी नाना पाटील यांनी बाबुराव लाड यांची नेमणूक केली.होती. सातारा गटात बाबुराव घोरपडे हे न्यायाधीश म्हणून काम पहात होते. या न्यायदान कमिटया जमिनीसंबंधीचे वाद, चोऱ्या,

मारामाऱ्या, बलात्काराचे गुन्हे, दारूचे गुत्ते, बायकांना न नांदविणे वगैरे संबंधी न्याय देण्याचे काम करीत असत. गावोगावची सावकार, पाटील, कुलकर्णी, हे गरीबांच्या जमिनी बळकावीत. गरीबांच्या बायकांची टेड काढीत. तेव्हा याचाही खटला या न्यायदान मंडळापुढे चालत असे. गुन्हेगाराला दंड करीत, पत्री मारण्याची शिक्षा करीत. या न्यायदान मंडळीनी भराभर अनेक खटल्याचे निकाल दिले. त्यामुळे गुन्हेगारीला पायबंद बसला. गरीबांना न्याय मिळू लागला. न्यायदानाचे काम नि:पक्षपातीपणे आणि सुरळीत चालत असे. त्यामुळे हे ग्रामराज्य अल्पकाळात लोकांच्यात प्रिय झाले. ग्रामराज्याची उभारणी स्वयंपूर्ण व्हावी यासाठी ग्रामराज्याकडे दाद मागणाऱ्या प्रत्येक अर्जदाराने प्रत्येक अर्जाला पन्नास पैसे फी द्यावी असा नियम करण्यात आला. ग्रामराज्याच्या घटनेनुसार विविध फिरत्या न्यायदान कमिटयांची व्यवस्था करण्यात आली होती. ही फिरती न्यायव्यवस्था खालीलप्रमाणे त्रिस्तरीय होती.

१) फिरते न्यायमंडळ
२) फिरते जनता कोर्ट
३) फिरते सर्वोच्च न्यायमंडळ

ब्रिटिश सत्तेविरूद्द लढा देत असतानाच प्रतिसरकारनेलोकांचे रक्षण करण्याचे व त्यांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याची बांधिलकी स्वीकारली होती. आणि म्हणून लोकांच्या कल्याणासाठी कमी खर्चात नि:पक्षपाती व झटपट न्याय मिळावा म्हणून प्रतिसरकारने गावोगावी न्यायदान मंडळे तसेच गट न्यायमंडळ व फिरती न्यायमंडळे स्थापन करण्यात आली. काही न्यायदान मंडळे स्थानिक होती तर काही न्यायदान मंडळे फिरती असत.

फिरते न्यायमंडळ -

या न्यायदान मंडळाच्या सदस्यांची निवड दोन पध्दतीने केली जात असे. त्यामध्ये लोक त्यांची निवड करीत किंवा लोक जर त्यांची निवड करु शकले नाहीत तर गटनायक आणि पर्यवेक्षक (सुपरवायझर) त्यांची नेमणूक करीत असे. अशा त-हेची निवड करीत असताना सदस्यांची कुवत, शहाण-पणा, प्रामाणिकपणा, प्रतिष्ठा, निर्णय घेण्याची स्वतंत्र बुध्दी या सर्व गोष्टी विचारात घेतल्या जात. सरपंचांची निवडणूक पंच एकमताने करीत असत आणि हा सरपंच सेक्रेटरी म्हणूनही ओळखला जात असे. पदग्रहण करण्यापूर्वी सर्व सदस्य आपण गावातील तंटे नि:पक्षपातीपणाने मिटवू अशी शपथ घेत असत. सदस्याचे पद हे त्याच्या चांगल्या वागणूकीवर अवलंबून राही. वागणूकीत बिघाड झाल्याबरोबर पर्यवेक्षकाच्या (सुपरवाय-झरच्या) शिफारशीवरुन प्रतिसरकारची कार्यकारिणी या पदावरुन काढून टाकीत असे. या शिवाय बहिर्जी पथक न्यायमंडळाच्या कामकाजाविषयी आपला गोपनीय अहवाल सरळ कार्यकारिणीकडे सादर करीत असे. पंच म्हणून काम करणा-या सदस्यांना वेतन किंवा मानधन दिले जात नसे.

त्याचप्रमाणे काही महत्त्वाच्या बाबी, दिवाणी आणि फौजदारी खटले चालविण्याचा अधिकार न्यायमंडळाला असे. गावातील ज्या माणसावर अन्याय झाला असेल तो सरळ न्यायमंडळाकडे न्याय मागण्यासाठी अर्ज करीत असे. अशा अर्जाची नोंद रजिस्टरमध्ये करण्यात येत असे. आठवडयातील एका ठरलेल्या दिवशी न्यायदान मंडळाची बैठक होत असे. या बैठकीचे अध्यक्ष सरपंच असत आणि ते खटल्यातील दोन्ही बाजूच्या मंडळीना आम्ही स्वच्छेने दिला जाणारा निवाडा पाळू अशी शपथ घेण्यास सांगत. खटल्यातील दोन्ही बाजूंच्या मंडळीना व त्यांच्या पाठीराख्यांना आपले म्हणणे मनमोकळे-पणे मांडू दिले जात असे. पंच आणि गावातील इतरांना उघडपणे खटल्यातील

दोन्ही बाजूच्या मंडळींची उलट-सुलट तपासणी घेतली जात असे. या कामकाजात भाग घेणारे निर्भिडपणे आपले मत व्यक्त करीत. कारण त्यांना प्रतिसरकारच्या संघटनेचा आधार असे. शेवटी सत्य बाहेर आल्यानंतर सदरच्या गुन्हेगाराला शिक्षा दिली जात असे.

यामध्ये दिला जाणारा न्याय नि:पक्षपातीपणे दिला जात असे. यामध्ये दिलेल्या निवाडयापैकी ६० ते ८० टक्के निवाडयांची अम्मलबजावणी आपोआप होत असे. जे गुन्हेगार निवाडयाची अम्मलबजावणी करण्याचे टाळत त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला जात असे. न्यायमंडळाने दिलेल्या निवाडयाची नोंद रजिस्टरमध्ये करण्यात येत असे आणि खात्यातील दोन्ही पक्ष निवाडा मान्य आहे म्हणून रजिस्टरमध्ये सही किंवा अंगठा उठवीत. दिवाणी व फौजदारी बाबीसंबंधी न्यायमंडळाने दिलेल्या निवाडयाविरूध्द पंधरा दिवसांच्या आत गट न्यायमंडळाकडे अपिल करण्याचा अधिकार असे. या अपीलाचा काळ संपल्यानंतर निवाडयाची अम्मलबजावणी होत असे. सरपंचामार्फत गट न्यायमंडळाच्या अध्यक्षाकडे अपील करण्यात येत असे. गट न्यायमंडळाने निर्णय देईपर्यंत न्यायमंडळाने दिलेल्या निवाडयाची अम्मलबजावणी होत नसे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला न्यायमंडळ आपला अहवाल पर्यवेक्षक (सुपरवायझरला) सादर करी आणि पर्यवेक्षक प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेला इन्स्पेक्टरला आपला अहवाल देत असे. या न्यायमंडळाने खेडयात बरेच रचनात्मक कार्य केल्याचे दिसून येते. या न्याय देण्याच्या पध्दतीमुळे खेडयातील जीवन आणि मालमत्ता अधिक सुरक्षित राहिली.

जनता कोर्ट (सार्वजनिक न्यायनिवाडा)

जनता कोर्टाचे प्रमुख तुफान सेनादलाचे फिल्डमार्शल जी.डी. लाड होते. सार्वजनिक न्यायनिवाडयाच्या वेळी तुफान सैनिक आणि राष्ट्रसेवादल सैनिक हे या न्यायदानाच्या कामकाजामध्ये मदत करीत असत. लोकांना दिवाणी

व फौजदारी खटले सरळ जनता कोर्टाकडे नेण्याची परवानगी असे. जनता कोर्टाच्या निवाडयाविरूद्द सर्वोच्च न्यायमंडळाकडे अपील करण्याचा अधिकार असे. असे अपील निर्णय दिल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सुपरवायझरच्या द्वारे पाठवावे लागत असे. तुफान सेनादलातील सैनिकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावांचा दौरा करून तक्रार गोळा करण्याचे आदेश दिले जात. तुफान सैनिकांची तक्रार अर्ज गोळा केल्यानंतर जनता कोर्ट गावोगावांना रात्री अपरात्री भेटी देत आणि खटले निकाली काढी. या न्यायदान-पद्दतीचे वैशिष्ट असे की जनता कोर्टाची बैठक गावातील देवळात अथवा चावडीसमोर भरत असे. या कोर्टाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी काहीवेळा रिव्हॉल्व्हर व बंदूका दाखविल्या जात. क्वचित प्रसंगी हवेत गोळीबार केला जात असे. या खटल्यातील दोन्ही बाजूकडच्या आठ ते दहा गावातील लोकांना एकत्र जमवीत. ज्या गुन्हेगाराचा तक्रार अर्ज असेल त्याची गावामध्ये सर्व गावकऱ्यासमोर जाहीर चौकशी करण्यात येत असे. या जाहीर चौकशीवरुन त्या व्यक्तीविरूद्धच्या तक्रारी खऱ्या आहेत अथवा खोटया आहेत हे गावकऱ्यांच्या साक्षीवरून ठरविण्यात येई व तक्रार खरी असल्यास पत्री मारणे, मारझोड करणे, सामाजिक धिक्कार टाकणे इत्यादी प्रकारच्या शिक्षा सुनावण्यात येत असत.

या न्यायदान पद्दतीचे वैशिष्ट्य असे की, ब्रिटिश न्यायदान व्यवस्थेप्रमाणे लिखित स्वरूपाच्या कायद्याचा वापर या व्यवस्थेत होत नसे. त्याचप्रमाणे ज्या व्यक्तीला आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटल्यास तो सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करु शकत असे. न्यायदान मंडळ आणि गट न्यायमंडळ यापेक्षा जनता कोर्ट लोकांच्यात अधिक लोकप्रिय असत. कारण अन्याय झालेल्या लोकांना ताबडतोब आणि स्वस्त न्याय मिळत असे.

## सर्वोच्च न्यायमंडळ :

या सर्वोच्च न्यायमंडळात प्रतिसरकारच्या कार्यकारिणीचे सदस्य असत. या न्यायमंडळाचे कार्यक्षेत्र जिल्हाभर असे. या न्याय मंडळाची सत्ता इतर न्यायमंडळापेक्षा अधिक व्यापक असे. वर निर्देश केलेल्या न्यायमंडळाने दिलेल्या निवाडयाविरुद्ध अपील हे गट न्यायमंडळाच्या अध्यक्षामार्फत सर्वोच्च न्यायमंडळाकडे केले जात असे. प्रतिसरकारच्या प्रमुखांना सर्वाधिकारी (डिक्टेटर) असे म्हटले जात असे. ते सर्वोच्च न्यायमंडळाच्या सभेचे अध्यक्ष म्हणून कामकाज पाहात. न्यायमंडळाने दिलेला निर्णय अंतीम असे. परंतु जर काही नवीन पुरावा आणला गेला किंवा एखाद्या मुद्यावर चर्चा अनवधानाने राहिली असे निदर्शनास आल्यावर संबंधित खटल्याचे कामकाज पुन्हा सुरु करण्यात येत असे. यानंतर दिलेला निर्णय हा मात्र अंतिम असे.

वर नमुद केलेल्या न्यायमंडळाच्या कामकाजाच्या चौकशी अहवालावरुन आणि न्यायमंडळे चालवीत असताना पकडलेल्या लोकांच्याकडे पोलिसांनी बराच पुरावा गोळा केला. त्या आधारे असे मत तयार करण्यात आले की अशा प्रकारची न्यायमंडळे चालविण्याचा अधिकार हा ब्रिटिश सरकारचा असल्यामुळे अशा न्यायमंडळाची स्थापना करणे म्हणजे ब्रिटिश सरकारचे सार्वभौमत्व हिरावून घेण्याचा एक प्रयत्न असे मत व्यक्त करण्यात आले. त्यामुळे भारतीय दंडविधानाच्या १२१ अ या तरतुदीनुसार या न्यायमंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या विरुद्ध खटले भरण्याचा विचार ब्रिटिश सरकारच्या अधिकाऱ्यांनी घेतला. परंतु वस्तुस्थिती अशी होती की, न्यायमंडळाकडे सादर केलेल्या तक्रारी अर्जाचे स्वरुप हे केवळ तक्रार निवारण करण्याची केवळ नियंत्रण यंत्रणा होती. त्यामुळे संबंधित कायद्यातील कोणत्याही तरतुदींचा भंग होत नव्हता. लोक ब्रिटिश कोर्टात न जाता या न्यायमंडळाकडे जात. त्यामुळे

तंटे सोडविण्याचा अधिकार हा कॉंग्रेस कार्यकर्त्याला आहे, अशा त-हेने चालविलेली न्यायमंडळे म्हणजे ग्रामराज्य चालविणे असा अर्थ जिल्ह्यातील अधिका-यांनी घेतला आणि ही वस्तुस्थिती होती. सातारा जिल्ह्यात या न्यायमंडळाद्वारे ग्रामराज्याचा प्रयोग यशस्वी करण्यात आला.

लोकशाही कारभार :

प्रतिसरकारच्या कारभाराची धोरणे व मर्यादा आणि कक्षा ठरविण्यात आल्या होत्या. पूर्णपणे लोकशाही कारभार व्यवस्थित चालवून दाखविला. न्यायनिवाडा करणे, सामाजिक शांतता प्रस्थापित करणे, जातीयता कमी करणे, एक गाव एक पाणवठा करणे या प्रकारची कामगिरी प्रतिसरकारने केली. सावकारी जबर व्याज व कर्जफेडीचे जुलूम, देण्याघेण्याचे व्यवहार, फौजदारी स्वरूपाचे गुन्हे इत्यादी बाबी त्यांनी न्यायदानात समाविष्ठ केल्या होत्या. न्यायनिवाडा करण्यापूर्वी त्याची योग्य माहिती मिळवणे, तपास करणे, खबर मिळवणे या कामासाठी प्रति सरकारने बहिर्जी पथक व तुफान सेना या संघटनांची निर्मिती केली. त्यांनी लोकांच्यात फिरून तक्रारी, गा-हाणी या संबंधिच्या माहितीची छाननी करून स्थानिक कमिटीला वारंवार अहवाल द्यावेत आणि त्याआधारे निर्णय द्यावेत अशी रचना करण्यात आली होती. सातारा प्रतिसरकारने पूर्णपणे लोकशाही कारभार लोकांना दिला. त्यामुळे ते ग्रामराज्य झाले.

प्रतिसरकारच्या लोकराज्यामध्ये तुफान सेना, तडजोड समिती आणि विविध न्यायमंडळे तंटे मिटविण्याचे व सुधारणा करण्याचे कार्य करीत असत. परंतु प्रतिसरकारच्या या तिन्ही घटकांच्यामध्ये आदीकाटेकोर सत्ताविभागणी केलेली नव्हती. कारण एकच मनुष्य दोन-तीन न्यायमंडळाच्या सदस्य असे.

सन १९४६ पर्यंत सातारा प्रतिसरकार न्यायदानाचे काम करीत असे आणि हे प्रतिसरकार नष्ट करणे इंग्रज सरकारला शक्य झाले नाही. [८]

.....

# संदर्भग्रंथ


१) शिवणीकर राघव, सातारचा सिंह, पृ. ११३.

२) डॉ. शिंदे आबासाहेब, सातारचे प्रतिसरकार, प्रसंग आणि व्यक्ती, पृ. ५३.

३) शिवणीकर राघव, सातारचा सिंह, पृ.क्र. ११५.

४) ठोके मो.नि., श्रमिकांचा कैवारी, पृ.क्र. १२७.

५) शिवणीकर राघव, सातारचा सिंह, पृ.क्र. १२०.

६) ठोके मो.नि., श्रमिकांचा कैवारी, पृ.क्र. १३०.

७) शिवणीकर राघव, सातारचा सिंह, पृ.क्र. १३२.

८) लाड जी.डी., मुलाखत दि. ३.११.१९९५ / वर्तमानपत्र सकाळ, दि. २९ जानेवारी, १९८४.


.....